राज्य योजना सन २०१५-१६
वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना या योजनेकरीता (२४०६-२२३२) निधी वितरीत करणे.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०७१५/प्र.क्र.२२७/फ-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१८ जानेवारी, २०१६.

वाचा :-

१. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.५५/(१५-१६)/४८६, दिनांक २०.०६.२०१५.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३६/(१५-१६)/१२२५, दिनांक ०१.१०.२०१५.
३. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३,दिनांक १७.०४.२०१५.
४. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०७१५/प्र.क्र.२२७/फ-१, दिनांक १३.०७.२०१५.
५. शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०७१५/प्र.क्र.२२७/फ-१, दिनांक २६.१०.२०१५.
६. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:-अर्थसं-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थ-३,दिनांक ०१.०१.२०१६.
७. वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक:- अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १२.०१.२०१६.

प्रस्तावना :-

सन २०१५-१६ राज्यस्तरीय योजनेतंर्गत वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना या योजनेकरीता (२४०६ २२३२) लेखाशिर्षाअंतर्गत रुपये ४००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर असून त्यापैकी रु. २८०.०० लक्ष नियतव्यय अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी रू. १४५.०० लक्षचा प्रस्ताव सादर केला. वित्त विभागाच्या संदर्भीय परिपत्रक क्रमांक ३ अन्वये सन २०१५-१६ करीता योजनेअंतर्गत वन्यप्राणी अपंगालयाची स्थापना (२४०६ २२३२) मधील विहीत प्रयोजनाखाली अर्थसंकल्पित निधीच्या ७० % मर्यादेत संदर्भ क्रमांक ४ च्या शासन निर्णयान्वये रु. १४५.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी रु १३५.९४ लक्षचा प्रस्ताव सादर केला आहे. संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये रु. ५१.०० लक्ष निधी असा एकूण रु १९६.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे

२. सन २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर नियतव्यय रु. ४००.०० लक्षपैकी अर्थसंकल्पित न करण्यात आलेला नियतव्यय रु. १२०.०० लक्ष नियतव्यय पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. संदर्भ क्रमांक ६ व ७ च्या परिपत्रकानुसार वित्त विभागाने पुरवणी मागणीच्या ५०% म्हणजे रु. ६०.०० लक्ष निधी वित्त विभागाने अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) वर उपलब्ध करुन दिला आहे.

शासन निर्णय :-

सदर शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून मौजे माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्र सभोवार संरक्षण भिंत बांधकाम (रु. ८४.८९ लक्ष) च्या कार्यबाबीपैकी रुपये ६०.०० लक्ष निधी खर्च करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सदर योजनेवर खर्ची टाकावयाची रक्कम सन २०१५-१६ मध्ये लेखाशिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, उपशीर्ष ०२ पर्यावरणीय वनीकरण, व वन्यजीवन, ११० वन्यजीवांचे जतन योजना (००) (१०) वन्यप्राणी अंपगालयाची स्थापना (राज्य) (२४०६ २२३२) अंतर्गत उद्दिष्टनिहाय, अर्थसंकल्प वितरण प्रणालीव्दारे प्राप्त होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

२. योजनांतर्गत प्रस्तावीत कार्यबाबींना आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे याची खातरजमा झाल्यानंतरच सदर कार्यबाबींवर निधी खर्ची टाकण्यात यावा.

३. वितरीत केलेला निधी शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेस विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून, प्रचलित धोरण व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

४. प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची जबाबदारी संबंधित नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील. कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता होऊ न देण्याचीही जबाबदारी त्यांची असेल.

५. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे व दिनांक १७.०४.२०१५, दिनांक ०१.०१.२०१६ व दिनांक १२.०१.२०१६ च्या परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांकः- अर्थसं-२०१५/प्र.क्र.२०१/अर्थ-३, दिनांक ०१.०१.२०१६ व क्रमांक :- अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक १२.१२.२०१६ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२०१३०८०१३३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

APTE ARVIND SHANKAR

Digitally signed by APTE ARVIND SHANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT,CID - 918010, postalCode=400032, st=Maharashtra, cn=APTE ARVIND SHANKAR
Date: 2016.01.20 13:12:38 +05'30'

(अरविंद आपटे)
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर

३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे
५. उप वनसंरक्षक, जुन्नर.
६. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षण), मुंबई/नागपूर
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. कक्ष अधिकारी (व्यव-१०), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. ब-१, फ-२, फ-१ कार्यासन (निवडनस्ती), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

****

शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-०७१५/प्र.क्र.२२७/फ-१, दिनांक १८ जानेवारी, २०१६ सोबतचे मासिक निधी विवरण पत्र.

(रक्कम रु. लाखात)

अ.क्र.	लेखाशिर्ष २४०६-२२३२	अर्थसंकल्पित निधी	जानेवारी, २०१६	फेब्रुवारी, २०१६	एकूण
१	२	३	४	५	७
१	५०-इतर खर्च	४००.००	३०.००	३०.००	६०.००

****